महाराष्ट्र विधानपरिषद

तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

किन्हवली (ता.शहापूर, जि.ठाणे) खाजगी गोदामात सरकारी भाताच्या गोण्या आढळून आल्याबाबत

(१) ३११२ (१०-०६-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.विनायकराव मेटे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किन्हवली (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील शांताराम सासें यांच्या खाजगी गोदामात सरकारी भाताच्या २०५ गोण्या आढळून आल्याचे दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास आदिवासी विकास महामंडळाचे संचालक मधुकर काटे यांच्या नेतृत्वाखाली छापा टाकला त्यावेळी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गोदामाला अधिकाऱ्यांनी सील ठोकले असून आदिवासी विकास महामंडळाचे हे भात काळाबाजार करण्यासाठी घेऊन जात असल्याचे व त्यामागे मोठे रॅकेट असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, गोरगरिबांना फसविणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी शहापूरवासियांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या गोदामातील भात खाजगी गोदामात आलाच कसा, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून त्यामागे अधिकारी व कर्मचारी तसेच दलाल असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (१०-११-२०२१) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सदर बाबतीत प्रादेशिक व्यवस्थापक, जव्हार यांनी शहानिशा केली असता महामंडळाच्या ताब्यात घेतलेला ८२.०० क्विंटल धान हे महामंडळाकडील नसून २ शेतकऱ्यांनी विक्रीस आणल्याचे बयाण त्या शेतकऱ्यांनी दिले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रादेशिक व्यवस्थापक, जव्हार यांनी केलेल्या चौकशीनुसार आदिवासी विविध सहकारी कार्यकारी संस्था वेहळोली दोषी आढळली असून त्यांनी अनियमितता केल्याचे दिसून आले आहे. आदिवासी विविध सहकारी कार्यकारी संस्था वेहळोली यांचेवर कार्यवाही करणेबाबत जिल्हा उपनिबंधक, सहनिबंधक विभागास कळविण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

तलासरी नगरपंचायत हद्दीतील धिंडेपाडा येथे ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेंतर्गत मिळणाऱ्या निधीचा गैरवापर केल्याबाबत

(२) ४१५७ (१७-०७-२०२०) श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तलासरी नगरपंचायत हद्दीतील धिंडेपाडा येथे ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेंतर्गत मिळणाऱ्या निधीचा गैरवापर करीत अकृषिक जमिनीक्षेत्रात बांधकाम करुन सदरहू काम आदिवासी वस्तीच्या नावाने

करण्यात आले असल्याचे भासवण्यात आल्याचा प्रकार दिनांक २४ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (११-११-२०२१) : (१) हे खरे नाही.

ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत धिंडेपाडा, ता.तलासरी, जि.पालघर येथील गटार बांधकामासंदर्भात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणु या कार्यालयाकडे कोणतीही तक्रार न झाल्याचे प्रकल्प कार्यालयाने नमुद केले आहे.

(२) धिंडेपाडा येथील गटार बांधकाम संदर्भातील आशयाचा विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. १२८८७ च्या अनुषंगाने या कामाची प्रकल्प कार्यालय डहाणु यांच्याकडुन प्रत्यक्ष पाहणी करण्यात आलेली होती. सदर पाहणीमध्ये या ठिकाणी आदिवासी वस्ती अत्यंत कमी प्रमाणात असल्याचे तसेच सदर गटारीचा उपयोग हा आदिवासी वस्तीत होत नसल्याचे दिसुन आले.

संबंधितांवर कारवाई करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

खेड नगरपरिषद रुग्णालयात आरोग्य अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करण्याबाबत

(३) ४५५३ (१७-०७-२०२०) श्री.अनिकेत तटकरे : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) नगरपरिषद दवाखान्यातील वैद्‌यकीय अधिकारी व इतर महत्वाची पदे मंजूर नसून आरोग्य विभागामार्फत कोणताही निधी उपलब्ध होत नसल्यामुळे खेड नगरपरिषदेवर खर्चाचा भार पडत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दवाखान्यात कोणत्याही सुविधा उपलब्ध नसल्याने साथीचे आजार वाढत आहेत तसेच सर्व्हेक्षण करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खेड नगरपरिषद दवाखान्यात आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देऊन आवश्यक आरोग्य अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (१२-११-२०२१) : (१) व (२) अपुरा कर्मचारीवर्ग व निधीची कमतरता असल्याची वस्तूस्थिती नगरपरिषदेने कळविलेली आहे. तथापि, खेड शहरात साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव होत असताना तो आटोक्यात आणण्याकरीता नगरपरिषदेमार्फत आरोग्यसेवक/ सहायक तसेच आशासेविका यांची वेळोवेळी तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यात येत असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(३) खेड नगरपरिषद रुग्णालयाकरीता आशासेविका, आरोग्य सहाय्यक/ सेवक यांची राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) अंतर्गत कायमस्वरुपी नेमणूक करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत असलेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडे नगरपरिषदेमार्फत नियमित पाठपुरावा करण्यात येत असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईत दरवर्षी पावसामुळे निर्माण होणारी पूर परिस्थिती टाळण्यासाठी राज्यात वॉटर ग्रीडची स्थापना करण्याबाबत

(४) ५०५२ (२०-११-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दरवर्षी पावसामुळे निर्माण होणारी पूर परिस्थिती आणि त्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी राज्यात वॉटर ग्रीडची स्थापना करण्याची सूचना केंद्रीय मंत्री मा.नितीनजी गडकरी यांनी शासनाला केली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भूमिगत वाहिन्यांच्या माध्यमातून पावसाचे पाणी आणि सांडपाणी शुध्दीकरण करून ठाण्यातील धरणात साठविल्यास शेती आणि दुष्काळी भागात हे पाणी वापरता येईल अशीही सूचना मा.केंद्रीय मंत्री यांनी केली असून मुंबईत दरवर्षी पुरामुळे प्रचंड नुकसान होत असल्यामुळे पुर परिस्थिती हाताळण्यासाठी एकात्मिक आराखड्याची आवश्यकता असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाची नेमकी भूमिका काय असून मुंबईतील पूर परिस्थिती हाताळण्यासाठी राज्यात वॉटर ग्रीडची स्थापना करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (११-११-२०२१) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पडणाऱ्या पावसाळ्याचे पाणी धरणांपर्यंत वाहून नेण्याकरीता भूमिगत जलबोगदे बांधणे व पाईपलाईन टाकणे आवश्यक आहे. मुंबई शहराच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करता सदर धरणे समुद्र सपाटीपासून अधिक उंचीवर असल्याने मुंबईतील पावसाळ्याचे पाणी उलटदिशेने धरणांकडे वाहून नेण्यासाठी मोठ्या क्षमतेची उदंचन केंद्रे उभारणे आवश्यक आहे. तसेच सदर धरणे पावसाळ्यामध्ये भरलेली असल्याने त्यांची उपलब्ध साठवण क्षमता कमी असते व पावसाळ्याचे पाणी धरणात सोडण्यापूर्वी त्यांचे संचयन व शुध्दीकरण करणे आवश्यक आहे.

या सर्व बाबींचा विचार करता सदर प्रस्ताव तांत्रिक व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेच्या दृष्टीने संयुक्तिक वाटत नाही असे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी निकष निश्चित करण्याबाबत

(५) ५११५ (१४-११-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी वर्गात सोशल डिस्टन्सिंग, शाळांचे निर्जंतुकीकरण, मास्क व सॅनिटायझर पुरविणे याबाबत निकष निश्चित करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर मतदार संघ) यांनी मा.मुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक ९ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.वर्षा गायकवाड (०९-११-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे. राज्यातील काही लोकप्रतिनिधींनी शाळा सुरु करण्यापूर्वी कोविड-१९ विषयक नियम करण्याची विनंती केली होती.

(२) शासनाने दिनांक १० नोव्हेंबर, २०२० रोजीच्या परिपत्रकान्वये इयत्ता ९ वी ते १२ वीचे वर्ग काही निर्बंधासह सुरु करण्यासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना (SOP) निर्गमित केल्या आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

राज्यातील मान्यताप्राप्त शाळांना अनुदान तसेच विनावेतन शिक्षकांचे वेतन प्रकरणी नेमलेल्या समितीच्या अहवालाबाबत

(६) ५२८१ (१८-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.बाळाराम पाटील,

डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम, श्री.संजय दौंड, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रसाद लाड, श्री.कपिल पाटील : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानास पात्र घोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि वर्ग तुकड्यांना दिनांक १ एप्रिल, २०१९ पासून २० टक्के वेतन अनुदान तसेच अंशत: अनुदानित शाळांना वाढीव २० टक्के वेतन अनुदान देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतला असून त्यानुसार दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, तसेच, अनुदानास पात्र म्हणून दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना दिनांक ०१ एप्रिल, २०१९ पासून २०% वेतन अनुदान देण्यासाठी आर्थिक तरतूद करुन शिक्षक-कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद विधीमंडळाने माहे फेब्रुवारी-मार्च, २०२० च्या अधिवेशनात मंजूर केला असून मंजूर केलेला निधी वितरणाचा शासन निर्णय अद्यापपर्यंत निर्गमित केला नसल्याने हजारो शिक्षक वेतनापासून व वाढीव वेतनापासून वंचित असल्याने असंतोष निर्माण झाला आहे, तसेच, राज्यातील विनाअनुदानित शाळांना दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयानूसार मुल्यांकनानूसार २०% निर्णय अंतिम करुन अनुदान मंजूर करावे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महत्वाच्या विषयाबाबत नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक १९/०९/२०२०, ०७/१०/२०२०, १३/१०/२०२० व त्यापूर्वीसुध्दा अनेक वेळा निवेदने देवून तातडीने निधी वितरण करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्याची विनंती केली परंतु अद्यापपर्यंत शासनाने याकडे दुर्लक्ष केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील शाळांना तात्काळ अनुदान वितरीत करावे तसेच मागील १५ वर्षांपासून अनियमित वेतन मिळालेल्या विनावेतन शिक्षकांना वेतन अदा करणे, या मागण्यांसाठी नवयुग क्रांती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबईतील आकाशवाणी आमदार निवासामधील चौथ्या मजल्यावरुन उडी मारुन आत्मदहन करण्याचा दिनांक १६ सप्टेंबर, २०२० रोजी प्रयत्न केला

असल्याचेही निदर्शनास आले आहे, उक्त प्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ गट समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, केव्हा, त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(५) तसेच, दिनांक १ एप्रिल, २०१९ रोजी तत्कालीन शासनाने राज्यातील ४३१७४ शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वाढीव २०% अनुदान देण्याचा घेतलेला निर्णय विद्यमान शासनाने बदलून दिनांक १ नोव्हेंबर, २०२० पासून वाढीव २०% अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे, तसेच, राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना पुढील अनुदानाचा वाढीव टप्पा देण्याबाबत व विनावेतन शिक्षकांच्या अनेक वर्षापासूनच्या प्रलंबित प्रश्नांसाठी दिनांक २६ ऑगस्ट, २०२० रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील प्रस्तावावर निर्णय घेऊन त्याबाबतचा अभ्यास करण्यासाठी मा.महसूल मंत्री यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १७ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मंत्रीगटाची समिती स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागील १५ वर्षांपासून अनियमित वेतन वा वेतन न मिळणाऱ्या शिक्षकांना वेतन वितरीत करण्यात यावे, विनाअनुदानित शाळांना १००% अनुदान तसेच शाळांना प्रचलित प्रमाणे अनुदान देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२१-१०-२०२१) : (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) होय.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ अन्वये प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदानास पात्र घोषित केले आहे. सदर शासन निर्णयातील काही अटी ह्या जाचक असल्याचे विविध संघटना व शिक्षक प्रतिनिधी यांनी सदर अटी रद्द कराव्यात, अशी विनंती शासनास करण्यात आली. यानुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली गठित त्रुटी समितीच्या शिफारशीनुसार शासन निर्णय, दिनांक १३/०९/२०१९ मधील काही अटी व शर्तीमध्ये शासन निर्णय दिनांक ०४/१२/२०२० अन्वये सुधारणा करण्यात आली.

त्यानुसार तपासणीअंती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना दिनांक १२/०२/२०२१ व दिनांक १५/०२/२०२१ अन्वये अनुदानास पात्र घोषित करून दिनांक ०१/११/२०२० पासून २० टक्के व यापूर्वी २० टक्के वेतन अनुदान घेणाऱ्या शाळांना वाढीव २० टक्के अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे.

(६)) प्रश्न उद्‌भवत नाही. शासन निर्णय, दिनांक १९/०९/२०२० अन्वये, अनुदान सुत्रात बदल करण्यात आला असून, सरसकट २० टक्के अनुदान सुत्र लागु करण्यात आले आहे.

राज्यातील अघोषित शाळांना अनुदान देण्याबाबत

(७) ५५६८ (१८-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मूल्यांकन होऊन क्षेत्रियस्तरावर अनुदानास पात्र होण्यासाठी प्रलंबित आहेत, तसेच मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार अघोषित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व नैसर्गिक वाढीच्या तुकड्या निधीसह अनुदानास पात्र घोषित करण्याबाबतचे प्रस्ताव तात्काळ निकाली काढण्याबाबत शिक्षक संघटना व नागपूर विभागाचे शिक्षक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजी पत्र क्रमांक ७६२४ व ७६२५ द्‌वारा शासनास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार शाळांचे अनुदान प्रस्ताव प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत, तसेच शासन या अनुदान पात्र शाळांच्या नैसर्गिक वाढीव तुकड्यांना अनुदान केव्हापर्यंत निर्गमित करणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळांना अुनदानास पात्र घोषित करुन निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१५-११-२०२१) : (१), (२) व (३) हे खरे आहे.

दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ च्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ अन्वये अनुदानास पात्र घोषीत करण्यात आले.

सदर शासन निर्णयातील अटी जाचक असल्याने त्या रद्द करण्याची विनंती विविध संघटना व शिक्षक प्रतिनिधी यांनी शासनास केली होती. यानुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली त्रुटी समिती गठित करण्यात आली होती. सदर त्रुटी समितीने केलेल्या शिफारशी दिनांक १४ ऑक्टोंबर, २०२० रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत ठेवून, सदर शासन निर्णयातील काही अटी व शर्तीमध्ये शासन निर्णय दिनांक ४ डिसेंबर, २०२० अन्वये सुधारणा करण्यात आली.

त्यानुसार तपासणीत पात्र ठरलेल्या खाजगी प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना शासन निर्णय, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२१ दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ व दिनांक २४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये दिनांक १ नोव्हेंबर, २०२० पासून सरसकट २० टक्के / वाढीव २० टक्के वेतन अनुदानास पात्र घोषित करुन, अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

मुल्यांकन झालेल्या परंतु अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या प्रस्तावांची तपासणी आयुक्त (शिक्षण) यांचे स्तरावर करण्यात येत असून, अनुदानास पात्र घोषित करण्यासाठीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

संत गाडगे बाबा अमरावती विद्‌यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द केल्याबाबत

(८) ६२७० (१३-१२-२०२०) श्री.सदाशिव खोत, डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगे बाबा अमरावती विद्‌यापीठाने आयोजित केलेल्या अंतिम वर्षाच्या ऑनलाईन परिक्षेत सर्व्हर डाऊन झाल्यामुळे ऐनवेळी परीक्षा रद्द केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यापीठाने यापूर्वी दोनवेळा ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने परीक्षा आयोजित करून तांत्रिक कारणामुळे परीक्षा पुढे ढकलल्या होत्या, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ प्रशासनाकडे परीक्षेसाठी लागणारी पुरेशी सक्षम यंत्रणा नसताना परीक्षा तांत्रिक अडचणीचे कारण देत पुढे ढकलल्यामुळे लाखो विद्यार्थ्यांना त्रास होत असतानाही शासनाचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील सर्वच विद्यापीठातील तांत्रिक अडचणी दूर करून विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत (२७-१०-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या अंतिम वर्ष/अंतिम सत्र परीक्षांच्या आढाव्याबाबत मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २३ ऑक्टोबर, २०२० रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक घेण्यात आली. ऑनलाईन परीक्षेसंदर्भात ज्या एजन्सीने चुकीचे काम केलेले आहे अशा एजन्सींना विद्यापीठांनी ब्लॅक लिस्टमध्ये टाकावे. तसेच संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन विद्यापीठ कायद्यातील तरतूदीनुसार उचित कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच विद्यापीठांच्या ऑनलाईन परीक्षेसंदर्भात झालेल्या तांत्रिक त्रुटीसंदर्भात चौकशी करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक महापालिकेच्या डॉ.झाकिर हुसेन व बिटको रुग्णालयात ऑक्सिजन टाक्या कार्यान्वित करण्याबाबत

(९) ८४६१ (१८-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात महापालिकेने डॉ.झाकिर हुसेन रुग्णालय व बिटको रुग्णालय येथे ऑक्सिजन टाक्या उभारल्या असून त्या कार्यान्वित करण्याकरीता तंत्रज्ञ उपलब्ध नसल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीतील कोरोना काळात ऑक्सिजनचा तुटवड्याचा अनुभव लक्षात घेता तात्काळ ऑक्सिजन टाक्या कार्यान्वित करण्याकरीता तंत्रज्ञ उपलब्ध करण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (१२-११-२०२१) : (१) व (२) हे खरे नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या डॉ.झाकीर हुसेन रुग्णालय व बिटको रुग्णालय येथे अनुक्रमे १३ KL व १९ KL च्या लिक्वीड मेडीकल ऑक्सीजनच्या टाक्या उभारण्यात आल्या आहेत. सदर टाक्या तैय्यो निप्पॉन सॅन्सो प्रा. लि., चाकण, पुणे या कंपनीच्या तंत्रज्ञांनी कार्यान्वित केल्या असून त्या सद्य:स्थितीत कार्यरत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे थकित वेतन अदा करण्याबाबत

(१०) ८५१४ (२०-०७-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सुमारे १०० हून अधिक शाळांमधील दहा हजार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे माहे फेब्रुवारी, २०२१ च्या वेतनापासून वंचित असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोनासारख्या महामारीच्या संकटात शिक्षकांना वेळेत वेतन न मिळण्याची कारणे काय आहेत, तसेच, वेतन न मिळाल्यामुळे शिक्षकांना आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार यासंदर्भात माहिती घेवून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन तातडीने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय अाहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२८-१०-२०२१) : (१) अंशत: खरे आहे.
(२) मुंबई विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे माहे फेब्रुवारी, २०२१ चे वेतन अदा करणेसाठी पुरेशी तरतुद उपलब्ध नसल्याने शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे यांच्या दिनांक १९/०३/२०२१ च्या पत्रान्वये अनुदान उपलब्ध करून दिल्यानंतर माहे फेब्रुवारी, २०२१ चे वेतन माहे मार्च, २०२१ मध्ये अदा करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कोंढवा बुद्रुक (जि.पुणे) येथील अनधिकृत बांधकामाबाबत

(११) ८५२९ (१६-०६-२०२१) श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोंढवा (बु) (जि.पुणे) येथील सर्वे नंबर ५९ मधील नागरिकांनी विकासक श्री.नितीन चोरडिया यांनी सुरू केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत पुणे महानगरपालिकेकडे तक्रार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाकरीता विकासकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ व २५४ अन्वये आवश्यक असणारी परवानगी पुणे महानगरपालिकेकडून घेतली नसतानाही उक्त अनधिकृत बांधकाम सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुणे महानगरपालिकेने विकासक श्री.नितीन चोरडिया यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (११-११-२०२१) : (१), (२) व (३) • कौंढवा बु. स.नं. ५९, गजानन महाराज नगर येथील बांधकामाबाबत पुणे महानगरपालिकेकडे तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे.

• श्री.नितिन चोरडिया यांचे नावे पुणे महानगरपालिकेकडून नोटीस बजावण्यात आली होती. त्यानंतर श्री.नितिन चोरडिया यांनी सदरची मिळकत विकली असून सदर विनापरवाना बांधकामाशी काहीही संबंध नसल्याबाबत कळविले आहे.

• सदर ठिकाणी श्री.कासीम इमामसाब शेख यांचेकडून पुणे महानगरपालिकेची आवश्यक असणारी परवानगी न घेता काम सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे.

• सदर अनधिकृत बांधकामावर दिनांक १८/०३/२०२१ रोजी कारवाई करण्यात आली होती. तथापि, कारवाई केल्यानंतरही सदरचे बांधकाम सुरु ठेवल्याने श्री.कासिम शेख यांच्याविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

वाडी (जि.नागपूर) येथील शीलादेवी कॉलेजच्या बी.एड. विद्‌यार्थ्यांना अनुत्तीर्ण केल्याबाबत

(१२) ८५८६ (२०-०७-२०२१) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडी (जि.नागपूर) येथील शीलादेवी कॉलेजच्या १३ बी.एड. विद्‌यार्थ्यांना परीक्षा न दिल्याने अनुत्तीर्ण केल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात विद्‌यार्थ्यांना जनरल प्रमोशन देवुन पास करण्याचा निर्णय झाला असताना देखील या १३ विद्‌यार्थ्यांना अनुत्तीर्ण करण्याची कारणे काय आहेत, तसेच, एकाच बी.एड. वर्गातील ३७ विद्‌यार्थ्यांना उत्तीर्ण केले असून १३ विद्‌यार्थ्यांना अनुत्तीर्ण करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत (२७-१०-२०२१) : (१) व (२) कोरोना काळात विद्‌यार्थ्यांच्या उन्हाळी २०२० परीक्षेचा निकाल घोषित करण्याची कार्यवाही विद्‌यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक २९/०४/२०२० तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक ०८/०५/२०२० च्या निर्णयानुसार करण्यात आली होती. यामध्ये विद्‌यार्थी उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण होणे हे त्यांच्या पूर्वीच्या सत्रांचे परिक्षेचे गुण व निकाल लागणाऱ्या परीक्षेच्या अंतर्गत गुणांवर अवलंबून होते. ज्या परीक्षेमध्ये अंतर्गत गुण नसतात त्या परीक्षेचे निकाल पूर्वीच्या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारावर घोषित करण्यात येतो त्यामुळे जर विद्‌यार्थ्याला पूर्वीच्या सत्रामध्ये कमी गुण असतील तर विद्‌यार्थी निकालामध्ये अनुत्तीर्ण सुध्दा होऊ शकतो. त्यानूसार, सदर महाविद्‌यालयातील शैक्षणिक सत्र २०२० मधील प्रथम सत्र बी.एड. परीक्षेमध्ये ५० विद्‌यार्थ्यांनी परीक्षा आवेदन पत्र सादर केले होते. त्यापैकी ४९

विद्यार्थ्यांनी लेखी परीक्षा दिली तर १ विद्यार्थी सर्व विषयाला अनुपस्थित होता. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या उपरोक्त निर्णयामुळे व्दितीय सत्र उन्हाळी २०२० परीक्षेमध्ये ३७ विद्यार्थी प्रथम सत्राच्या सरासरी गुणाच्या आधारावर उत्तीर्ण झाले, १ विद्यार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्याचा निकाल Absent म्हणून घोषित झाला. तसेच, इतर १२ विद्यार्थी प्रथम सत्राच्या सरासरी गुणांमुळे अनुत्तीर्ण झाले.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अनुदानित आश्रमशाळांमधील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकरीता नो वर्क नो पे हा शासन निर्णय रद्द करण्याबाबत

(१३) ८५८९ (१३-०७-२०२१) श्री.कपिल पाटील : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वयंसेवी संस्थाकडून आदिवासी विद्यार्थ्यांकरीता चालविण्यात येणाऱ्या मान्यताप्राप्त अनुदानित आश्रमशाळांमधील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे समायोजन होईपर्यंत, काम नाही वेतन नाही (नो वर्क नो पे) हा शासन निर्णय रद्द करण्याबाबत मागणी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने स्वयंसेवी संस्थाकडून आदिवासी विद्यार्थ्यांकरीता चालविण्यात येणाऱ्या मान्यताप्राप्त अनुदानित आश्रमशाळांमधील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे समायोजन होईपर्यंत नो वर्क नो पे हा शासन निर्णय रद्द होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (०८-११-२०२१) : (१) होय.

(२) आदिवासी विकास विभागाने शासन निर्णय दिनांक ०८/०६/२०१६ अन्वये विभागांतर्गत अनुदानित आश्रमशाळांमधील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन होईपर्यंत त्यांना काम नाही वेतन नाही. हे धोरण लागु केले. मात्र या निर्णयास संबंधितांकडुन विरोध झाला. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने अशाच प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश विचारात घेउन शुद्धीपत्रक निर्गमित केले होते. त्यामुळे आदिवासी विकास विभागाने देखील दिनांक २९/०४/२०१७ च्या शासन निर्णयान्वये शुद्धीपत्रक निर्गमित केले असून त्यानुसार विद्यार्थीसंख्या कमी झाल्याने आश्रमशाळेचा एखादा वर्ग/तुकडी कमी झाल्यास मात्र सदर शाळा सुरु असल्यास अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबाबत महाराष्ट्र खाजगी शाळांमधील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मध्ये नियम २६ व २७ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी. परंतु त्यांचे वेतन बंद न करता समायोजन होईपर्यंत वेतन सुरु ठेवण्यात यावे.

उपरोक्त बाब पहाता काम नाही वेतन नाही या धोरणात शासनाने आवश्यकतेप्रमाणे बदल केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अकृषी विद्यापीठातील कक्ष अधिकाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत

(१४) ८७०१ (२०-०७-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक लोकप्रतिनिधी आणि महाराष्ट्र युनिव्हर्सिटीज ऑफ फोरम कास्ट्राईब सोलापूर विद्यापीठ कर्मचारी संघटना, सोलापूर विद्यापीठ कर्मचारी संघटना, सोलापूर विद्यापीठ चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठ तसेच कृषी विद्यापीठातील कक्ष अधिकाऱ्यांनी दिनांक

०६/०८/२०१८ रोजी संयुक्त स्वाक्षरीने निवेदन राज्य शासनास सादर करून मंत्रालय आणि मा.उच्च न्यायालयातील कक्ष अधिकाऱ्यांना मंजूर केलेले सुधारित वेतनश्रेणी अधिकार, कर्तव्य व जबाबदाऱ्या सारखेच असल्याने अकृषी विद्यापीठातील कक्ष अधिकाऱ्यांना देखील चार वर्षाच्या नियमित सेवेनंतर सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे रुपये १५,६००-३९,१०० अधिक ग्रेड वेतन रुपये ५४०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत लोकप्रतिनिधी, संघटना, विद्यापीठे इत्यादी माध्यमातून राज्य शासनास निवेदन प्राप्त झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विनंती निवेदनाच्या अनुषंगाने राज्यातील अकृषी विद्यापीठातील कक्ष अधिकाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत शासनस्तरावर उचित निर्णय घेण्यात येईल असे वित्त विभागाकडून कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंत्रालय तसेच मा.उच्च न्यायालयातील कक्ष अधिकाऱ्यांना मंजूर केलेली सुधारित वेतनश्रेणी अकृषी विद्यापीठातील कक्ष अधिकाऱ्यांचे अधिकार, कर्तव्य व जबाबदाऱ्या सारख्याच असल्याने अकृषी विद्यापीठातील कक्ष अधिकाऱ्यांना वेगवेगळ्या निवेदनातून मागणी केलेले सुधारित वेतन मंजूर करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सुधारित वेतनश्रेणी मंजुरीच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत (२९-१०-२०२१) : (१) होय.

(२) होय.

(३) याबाबत राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या वेतनश्रेणी त्रुटींविषयक शिफारशींच्या अहवाल खंड-२ मधील शिफारशीनुसार उचित निर्णय घेण्यात येईल.

(४) व (५) राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ चा अहवाल खंड-२ शासनास प्राप्त झाला आहे. तथापि, सध्या कोविड (कोरोना) परिस्थितीमुळे खर्चावर मर्यादा आहेत. शासनाने दिनांक ०४ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे खर्चावर निर्बंध घातले आहेत. अशा परिस्थितीत सध्या नवीन खर्च किंवा

खर्चात वाढ होणाऱ्या योजना करणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ वर काही कालावधीनंतर व आर्थिक स्थितीत सुधारणा झाल्यावर निर्णय घेणे योग्य ठरेल, असा निर्णय घेण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्यातील भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याबाबत

(१५) ८८०४ (११-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ६८९६ ला दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील भिडेवाडा बुधवारपेठ या दुमजली वाड्यात दिनांक १ जानेवारी, १८४८ रोजी भारतातील पहिली स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली असून पुज्यनीय सावित्रीबाई फुले यांनी या वाड्यात पहिली मुलींची शाळा सुरू करुन पहिल्या आद्य शिक्षिका म्हणून हे कार्य पुढे नेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ऐतिहासिक वास्तुची दुरवस्था झाल्यामुळे उक्त भग्न अवस्थेतील वास्तू शासनाने ताब्यात घेवून राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा देण्याकरीता भिडेवाडा दुरुस्तीसाठी पुणे महानगरपालिकेच्या सन २०१९-२०२० च्या अंदाजपत्रकात रुपये १,४०,००,०००/- एवढ्या रकमेची तरतुद करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वास्तुतील भाडेकरू/मालक यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.३०९०/२०१० व ३५१९/२०१० दाखल केल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने भूसंपादनाची कार्यवाही स्थगित करण्याचे आदेश दिल्याने मा.उच्च न्यायालयातील प्रलंबित असलेली प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढून शासनाची बाजू मांडण्यासाठी राज्याच्या विधी व न्याय विभागामार्फत दिनांक २९ जुलै, २०२० रोजीच्या पत्रान्वये महाअधिवक्ता, मा.उच्च न्यायालय यांना देण्यात आलेल्या सूचनेनुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केलेले भाडेकरू/मालक यांच्यासोबत चर्चा करून सर्व मान्य तोडगा काढण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी, पुणे तसेच आयुक्त, पुणे महानगरपालिका व संचालक, पुरातत्व विभाग यांचेकडून एकत्रितपणे कोणते प्रयत्न करण्यात आले वा येत आहे,

(५) असल्यास, भिडेवाडा ही ऐतिहासिक वास्तू ताब्यात घेवून राष्ट्रीय दर्जाचे स्मारक करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे, आयुक्त, पुणे महानगरपालिका तसेच शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (१०-११-२०२१) : (१) व (२) होय खरे आहे.

(३), (४) व (५) • मा.उच्च न्यायालयातील प्रलंबित असलेली प्रकरणे लवकरात लवकर निकाली होण्याच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाची बाजू मांडण्यासाठी राज्याच्या विधी व न्याय विभागामार्फत दिनांक २९/०७/२०२० च्या पत्रान्वये महाअधिवक्ता मा.उच्च न्यायालय यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. पुणे महानगरपालिकेमार्फत त्यानुषंगाने पाठपुरावा सुरु असून मा.उच्च न्यायालयात प्रकरण अद्याप प्रलंबित आहे.

• याबाबत दिनांक १६/०२/२०२१ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयामध्ये जिल्हाधिकारी, पुणे व आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी संबंधित जागा मालक / भाडेकरु यांचे समवेत बैठक घेतली आहे.

• या प्रकरणी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केलेले भाडेकरु/मालक यांच्यासोबत चर्चा करुन सर्व मान्य तोडगा काढण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी, पुणे तसेच पुणे महानगरपालिका, संचालक, पुरातत्व विभाग यांचेकडून एकत्रितपणे प्रयत्न करण्यात येत आहेत.

• विशेष भूसंपादन अधिकारी यांनी सरकारी वकीलांशी चर्चा करून सदरचे प्रकरण निकाली काढून निवाडा जाहीर करण्यास परवानगी मिळण्यासाठी इंटरिम ॲप्लीकेशन दाखल केले आहे. तसेच याप्रकरणी विविध स्तरावरील अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

• भू-संपादनाची कार्यवाही पूर्ण होवून सदर वास्तू ताब्यात आल्यावर राष्ट्रीय स्मारक उभारण्याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्याचे प्रयोजन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

नेट/सेट उत्तीर्ण अधिव्याख्यात्यांच्या सेवा पदोन्नतीकरीता नियुक्ती दिनांकापासून ग्राह्य धरण्याबाबत

(१६) ८८११ (२०-०७-२०२१) श्री.नागोराव गाणार, डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासन निर्णय, दिनांक १८/१०/२००१ अन्वये दिनांक १९/०९/१९९२ ते दिनांक ११/१२/१९९९ या कालावधीत नियुक्त झालेल्या सर्व बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांना माहे डिसेंबर, २००३ पर्यंत नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या अधिव्याख्यात्यांनी माहे डिसेंबर, २००३ पर्यंत नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण केली त्यांच्या सेवा पदोन्नतीकरीता नियुक्ती दिनांकापासून ग्राह्य धरणे बंधनकारक व अनिवार्य आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियुक्ती दिनांकापासून ग्राह्य धरण्याची मागणी नागपूर विभागाचे शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक २१ जानेवारी, २०२१ रोजी निवेदन पाठवून केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत (२९-१०-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक १८/१०/२००१ अन्वये दिनांक १९/०९/१९९१ ते दिनांक ११/१२/१९९९ या कालावधीत अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयातून व संस्था यामधून त्यावेळेच्या निवड समितीमार्फत नियुक्त झालेल्या (बिगर नेट/सेट) अधिव्याख्यात्यांनी डिसेंबर २००३ पर्यंत नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(२) हे खरे नाही.

दिनांक १९/०९/१९९१ ते दिनांक ११/१२/१९९९ या कालावधीतील नियुक्त बिगर नेट/सेट अधिव्याख्याता ज्या तारखेला नेट/सेट परीक्षा पास करतील त्या तारखेपासून त्यांची सेवा वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणीच्या लाभासाठी ग्राह्य धरली जाईल, अशी तरतूद शासन निर्णय दिनांक १८/१०/२००१ अन्वये करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) दिनांक २३/१०/१९९२ ते दिनांक ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून ग्राह्य धरण्यात याव्यात याबाबत विविध लोकप्रतिनिधी तसेच शिक्षकीय संघटनांकडून निवेदने प्राप्त होत असतात. तथापि, दिनांक २३/१०/१९९२ ते दिनांक ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा शासन निर्णय दिनांक २७/०६/२०१३ अन्वये शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून काही अटींच्या अधीन राहून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर शासन निर्णयाविरूध्द मा.उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठापुढे याचिका दाखल झालेल्या होत्या. याचिका क्र. २०८२/२०१३ व इतर सर्व समान विषयाच्या याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३/१२/२०१५ रोजी निर्णय देऊन सदर शासन निर्णय योग्य ठरविला आहे. मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशास याचिकाकर्ते यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र. ७६८५/२०१६ द्वारे आव्हान दिलेले असून सद्य:स्थितीत प्रस्तुत प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड ते आलापल्ली या मार्गावरील पुलांची उंची वाढविण्याबाबत

(१७) ८८१६ (१८-०६-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड ते आलापल्ली या मार्गावरील चंद्र नाला, ताडगांव नाला, कुडकेली नाला, कुमरगुंडा नाल्यावरील पुलांची उंची कमी असल्याने पावसाळयात हा मार्ग पूर्णत: बंद होत असल्यामुळे दुर्गम भागातील नागरीकांना जिल्ह्याच्या ठिकाणी येण्यास अडचण निर्माण होत असल्याने उक्त पुलाची उंची वाढविण्याबाबतची मागणी गावकऱ्यांनी वारंवार करूनही अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे दिनांक ९ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उपरोक्त पुलांची उंची वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (०८-११-२०२१) : (१) व (२) गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड ते आलापल्ली रा.म.१३० डी महामार्गावरील चंद्र नाला, ताडगाव नाला, कुमरगुंडा नाल्यावरील कमी उंचीच्या पूलांच्या कामांबाबतची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून सदर कामे लवकरच हाती घेण्यात येत आहेत. तसेच कुडकेली नाल्यावरील कमी उंचीच्या पूलाच्या कामाचा वार्षिक आराखडा (Annual Plan) २०२१-२२ अंतर्गत समावेश झाला असून सदर काम हाती घेण्याच्या दृष्टिने पुढील प्रक्रिया सुरु आहे.

याशिवाय सद्य:स्थितीत भामरागड ते आलापल्ली महामार्गावर पर्लकोटा, बांडीया आणि पेरीमिली या नदयांवरील तीन ठिकाणी मोठ्या पूलांची कामे हाती घेण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात आदिवासी विकास महामंडळाच्यावतीने खरेदी केलेले धान साठवणुकीसाठी गोदामाचे बांधकाम करण्याबाबत

(१८) ८८२४ (१६-०६-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळाद्वारे हमीभावाने खरेदी केलेल्या शासकीय धान्य साठवणूकीसाठी गोदामांची सोय नसल्यामुळे कोटयवधी रूपयांचे खरेदी केलेले धान्य उघड्यावर वा ताडपत्र्या झाकून केंद्राबाहेर ठेवावे लागत असून शेतकऱ्यांच्या धान्यांचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची बाब सन २०२० ते सन २०२१ या कालावधीत निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धान्य उघड्यावर रहात असल्याने पाऊस व इतर नैसर्गिक आपत्तींपासून धान्यांचे होणारे नुकसान टाळण्याकरीता शासनाने तातडीने धान्य गोदाम बांधकामास सुरुवात करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आहे, त्यानुषंगाने धान्यांचे संरक्षण व साठा करण्यासाठी धान गोदामाच्या बांधकामास सुरुवात करण्याच्या दृष्टीने बृहतआराखडा तयार करण्यात आला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (१०-११-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

ज्या खरेदी केंद्रावर धानाची खरेदी मोठ्या प्रमाणात होत असते धान साठवणूकीसाठी त्या भागातील शासकीय संस्थेची वा खाजगी गोदामे हंगाम निहाय भाडे तत्वावर घेण्यात येतात. तथापी, ज्या भागात गोदामे नाहीत तेथे खरेदी होणारा बराचसा धानसाठा उघड्यावर साठवणूक करून ताडपत्रीने झाकून ठेवण्यात येवून त्याची लवकरात लवकर विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करण्यात येतो.
(२) व (३) जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडून गडचिरोली जिल्ह्यामध्ये गोदाम बांधकामासाठी ७ ठिकाणी जागा मंजूर झालेल्या असून ५ ठिकाणी जागा प्राप्त झाल्या असून उर्वरित २ ठिकाणच्या जागा प्राप्त करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नागपूर यांनी ७ गोदामे बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करून निविदा प्रक्रिया पूर्ण केलेली आहे.

तसेच जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडून FRA अंतर्गत १४ ठिकाणी गोदामे बांधकामासाठी जागा प्राप्त करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील आदिवासी विकास महामंडळात कार्यरत असलेल्या आणि सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी बनावट एमएससीआयटी प्रमाणपत्र सादर केल्याबाबत

(१९) ८८५१ (०९-०६-२०२१) श्री.नरेंद्र दराडे : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास महामंडळात कार्यरत असलेल्या आणि सेवानिवृत्त्त झालेल्या वर्ग-२ व वर्ग-३ च्या ३०० पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांनी बोगस एमएससीआयटी (संगणक अर्हता) प्रमाणपत्र सादर केले असून त्यांच्या प्रमाणपत्राची तपासणी करण्याचा निर्णय महामंडळाने माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सुरु असलेला तपास पूर्ण झाला आहे काय व त्यान्वये किती कर्मचाऱ्यांनी बनावट प्रमाणपत्रे सादर करुन लाभ घेतल्याचे निदर्शनास आले आहे, याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्‌यःस्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (०९-११-२०२१) : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

घनसावंगी (ता.जि.जालना) येथील मॉडेल कॉलेजच्या पात्र शिक्षकांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन देण्याबाबत

(२०) ८९११ (२०-०७-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने सन २०११-२०१२ या वर्षी बुलढाणा, गडचिरोली, हिंगोली, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग व जालना अशा ७ मॉडेल कॉलेजची स्थापना केली असून त्याचे प्रशासन चालविण्याची जबाबदारी त्या त्या विद्यापीठाकडे सोपविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १४/०३/२०१३ च्या शासन निर्णयानुसार मॉडेल कॉलेजच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी प्रतिवर्ष रुपये १.०० कोटी व प्रशासकीय कामासाठी रुपये ५० लाख देण्याची शासनाने तरतुद करुन प्रतिवर्ष विद्यापीठास सदरहू रक्कम वेळेवर दिली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील बुलढाणा, गडचिरोली, हिंगोली, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग येथील मॉडेल कॉलेजच्या पात्र कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्यासाठी त्या त्या विद्यापीठीने निर्णय घेतला परंतु घनसावंगी या मॉडेल कॉलेजच्या कर्मचाऱ्यांकरीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने निर्णय घेतला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन घनसावंगी येथील मॉडेल कॉलेजच्या पात्र शिक्षकांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत (२८-१०-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.

(२) आदर्श महाविद्यालयांच्या वेतन व वेतनेत्तर अनुदानाबाबत संबंधित विद्यापीठाकडून उच्च शिक्षण संचालनालयामार्फत शासनास प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन तरतूद उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) व (४) आदर्श महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर पदांना अद्याप शासन मान्यता प्राप्त झाली नसल्याने सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन अदा केले जात नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

गुरु गोविंदसिंगजी अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यरत असलेल्या कंत्राटी प्राध्यापकांना सेवेत कायम करणेबाबत

(२१) ८९२७ (१५-०६-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री गुरु गोविंदसिंगजी अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड या स्वायत्त संस्थेत १० पदवी व ३ पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ७ डिसेंबर, २०१९ च्या शासन निर्णयानुसार संस्थेच्या शिक्षकीय पदाचा आढावा मंजूर झाला असून संचालक, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक असे एकूण १४० पदे मंजूर असून त्यापैकी ७२ प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता मागील १० वर्षापासून कंत्राटी पध्दतीने १६ प्राध्यापकांच्या नेमणुका केल्या असून आजपर्यंत सदरहू प्राध्यापक कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कंत्राटी प्राध्यापकांची १० वर्षाची सेवा व त्यांचा भवितव्याच्यादृष्टीने सदर प्राध्यापकांना विना अट सेवेत कायम करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत (१५-११-२०२१) : (१) अंशत: खरे आहे.

श्री.गुरु गोविंदसिंगजी अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड या संस्थेस सन २००४ मध्ये स्वायत्तता मिळाली असून संस्थेमध्ये १० पदवी व १० पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम शिकविले जातात.

(२) अंशत: खरे आहे.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या सन २०१९ च्या सुधारीत मानकांनुसार विद्यार्थी शिक्षक यांचे प्रमाणात बदल झालेला आहे. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-११११/१८०/१९/तांशि-२, दिनांक ७ डिसेंबर, २०१९ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या पदाच्या सुधारीत आकृतीबंधानुसार श्री.गुरु गोविंदसिंगजी अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड या संस्थेस १० पदवी अभ्यासक्रमासाठी एकूण १४० शिक्षकीय पदे मंजूर केलेली आहेत.

सद्य:स्थितीत संस्थेत ६५ अध्यापक कार्यरत आहेत.

(३), (४) व (५) गुरु गोविंदसिंगजी अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड या स्थंस्थेत संस्थेमार्फत कंत्राटी पध्दतीने नियुक्त १६ अध्यापक कार्यरत आहेत. सदर अध्यापकांनी त्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.४५४६/२०१६ दाखल केली आहे. असून प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

कंत्राटी तत्वावर अध्यापकांची नियुक्ती करणेबाबत वा त्यांच्या सेवा नियमित करणेबाबत शासनाचे धोरण अस्तित्वात नाही.

सदर न्यायालयीन प्रकरणी मा.न्यायालयात शासनाकडून शपथपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरणी सुनावणी सुरु असून प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

अकोला शहरातील न्यु तापडिया नगरातील रेल्वे उड्डाणपुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(२२) ८९७७ (११-०६-२०२१) श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील न्यु तापडिया नगरातील रेल्वे उड्डाणपुलाचे काम गत वर्षभरापासून अत्यंत धीम्या गतीने सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शारदा कंस्ट्रक्शन प्रा.लि. नांदेड या कंपनीला कार्यारंभ आदेश देताना पर्यायी मार्ग योग्यरित्या सुचविण्याचे आदेश असतानाही उक्त कंपनीने सातव चौकापासून ते रेल्वे गेटकडील न्यु तापडीया नगर तसेच खरप परीसर या भागातील पर्यायी रस्ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे पावसाळ्यात सदर मार्गावर तीन ते चार दुर्घटना घडल्या असून परिसरातील नागरिकांनाही रहदारी करताना त्रास सहन करावा लागल्याची तक्रार स्थानिकांनी प्रशासनाकडे केली असल्याची बाब दिनांक २० सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने व कार्यकारी अभियंता सा.बां. अकोला यांनी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निविदेच्या अटी व शर्तीचे उल्लंघन करणाऱ्या शारदा कंस्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीवर तसेच उप अभियंता यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (०२-११-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडील काम प्रगती पथावर असून, रेल्वे हद्दीतील भागाचेही काम रेल्वे विभागाव्दारे करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

सदर काम ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये येते त्यांच्याकडे कुठल्याही दुर्घटना किंवा अपघात घडला असल्याची नोंद उपलब्ध नाही. तसेच कार्यालयाच्या अभिलेखात कुठलीही तक्रार उपलब्ध नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

———————

अनुसूचित जमातीच्या बांधवासाठी खावटी योजनेंतर्गत अनुदान देण्याबाबत

(२३) ९०२६ (१६-०६-२०२१) श्री.प्रशांत परिचारक, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना काळात निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे आदिवासी जमाती सर्वात जास्त प्रभावित झाल्या असून सोलापूर जिल्ह्यातील जवळपास १० हजार आदिवासी कुटुंबीय शासनाच्या खावटी योजनेस पात्र असून त्यांना खावटी योजनेंतर्गत अनुदानाचा लाभ मिळावा असे निदेश मा.आदिवासी विकास मंत्री यांनी दिले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विभागाच्या खावटी योजनेंतर्गत पात्र कुटुंबास ४०००/- रुपयांचे अनुदान देण्यात येते, त्यापैकी २०००/- रोख व उर्वरित २०००/- रुपये धान्य स्वरुपात अदा केले जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत कोरोना काळातील टाळेबंदी, आदिवासी विद्यार्थ्यांची बंद असलेली शाळा यामुळे देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा बंद असल्याने मोठ्या प्रमाणावर आदिवासी कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने आदिवासी समाजासाठी खावटी योजनेंतर्गत अनुदान देण्याची घोषणा करून देखील अनुदान मिळत नसल्याचे तसेच गतवर्षाचे अनुदान ही अद्याप मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने लाभार्थी आदिवासींचे सर्वेक्षण करुन खावटी योजनेंतर्गत आदिवासी कुटुंबांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी किती रुपयाची आर्थिक तरतूद केली आहे, राज्यातील किती आदिवासी जमातीच्या बांधवांना त्यांचा लाभ मिळाला, तसेच अनुदान तात्काळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (१०-११-२०२१) : (१) हे खरे आहे.

दिनांक ९ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयात नमूद निकषाप्रमाणे प्रकल्प कार्यालयांकडून केलेल्या सर्वेक्षणानुसार पात्र लाभार्थी संख्या ५२०० असून सदर लाभार्थ्यांना खावटी अनुदान वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) आदिवासी लाभार्थी प्रति कुटुंबीयांना खावटी अनुदान रक्कम रुपये ४०००/- ची आर्थिक तरतूद आहे. त्यापैकी रक्कम रुपये २०००/- देय असलेली डाक/बँक खात्यात जमा करण्यात आलेली आहे. व उर्वरीत रक्कम रुपये २०००/- चे अन्नधान्य व वस्तुस्वरूपात खावटी किट वाटपाची कार्यवाही प्रकल्प कार्यालय स्तरावर सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

भांडारपाल संवर्गीय कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त कार्यभार दिल्याबाबत

(२४) ९०२७ (२०-०७-२०२१) श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **कौशल्य विकास, रोजगार व उद्‌योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, दिनांक २२/०७/२००२ अन्वये राज्यातील सर्व औद्‌यागिक प्रशिक्षण संस्थामध्येच संस्था व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आल्या असून त्यानुसार संस्था व्यवस्थापन समितीची रचना, कर्तव्य व जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, PUBLIC PRIVATE PARTNERSHIP व STRIVE (SKILL STRENGTHENING FOR INDUSTRIAL VALUE ENHANCEMENT) या योजनेंतर्गत संस्था व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भांडारपाल संवर्गीय कर्मचाऱ्यांवर नियमबाह्य कारभार देण्यात आला असून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या यंत्र सामुग्री, कच्चा माल व इतर साधन सामुग्री यांची दक्षता घेणे याव्यतिरिक्त भांडारपाल संवर्गीय कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या निधीतून खरेदी करण्यात आलेल्या साहित्यांची दक्षता, अभिलेख व कागदपत्रे पूर्ण करण्याची अतिरिक्त जबाबदारीची कामे मानधन न देता नियमित वेतनातून करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भांडारपाल संवर्गीय कर्मचाऱ्यांवर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या कामकाजाव्यतिरिक्त केंद्र शासनाच्या योजनेचा कार्यभार आल्यामुळे त्यांना अतिरिक्त कार्यभार दिल्यास नियमाप्रमाणे लागू असलेले मानधन देण्यात यावे अथवा केंद्र शासनाच्या योजनेनुसार वेगळा भांडारपाल नेमण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य शासकीय भांडार संवर्ग कर्मचारी संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरची मागणी पूर्ण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.नवाब मलिक (१७-११-२०२१) : (१) होय खरे आहे.
(२) होय खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) अश्या प्रकारची मागणी शासनाकडे प्राप्त झाल्याची दिसून येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहर व ग्रामीण येथील ई-पॉस मशीनवरील धान्य वितरण बंद करण्याबाबत

(२५) ९०५५ (१५-०६-२०२१) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेश कराड : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संपूर्ण देशात कोरोना संसर्गाचा धोका असताना नागपूर शहर व ग्रामीण येथे मोफत धान्यासाठी ई-पॉस मशीनवर अंगठा लावत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना काळात ई-पॉस मशीनवरील धान्याचे वितरण बंद करावे अशी मागणी स्वस्त धान्य दुकानदारांनी करुनही याकडे शासनाने दुर्लक्ष केले असून ई-पॉस मशीनमुळे मागील वर्षभरात अनेक स्वस्त धान्य दुकानदार कोरोना पॉझिटिव्ह तर काही दुकानदार कोरोनामुळे मृत्यू पावले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मृत्यू पावलेल्या स्वस्त धान्य दुकानदारांचा परवाना शासनाद्वारे त्यांच्या वारसदारांना देण्यात येणार आहे काय, तसेच, दिनांक १ मे पासून सुरु झालेल्या ५ किलो मोफत धान्याचे वाटप ई-पॉस मशीनमुळे झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ई-पॉस मशीनवरील धान्याचे वितरण बंद करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.छगन भुजबळ (०१-११-२०२१) : (१) हे खरे नाही. कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील लाभार्थ्यांना संसर्ग होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शासन परिपत्रक दिनांक ३०/०४/२०२१ अन्वये लाभार्थ्यांची बायोमेट्रिक पडताळणी न करता रास्तभाव दुकानदारांनी स्वत:चे आधार अधिप्रमाणित करुन ई-पॉस उपकरणाद्वारे अन्नधान्य वितरीत करण्याबाबतची सुविधा दिनांक ३१/०५/२०२१ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली होती.
(२) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार धान्याचे वितरण ई-पॉस मशीनद्वारे करणे आवश्यक असून रास्तभाव दुकानदारांची मागणी लक्षात घेता कोरोना विषाणूचा संसर्ग होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून रास्तभाव दुकानांतून शिधावस्तुंचे वितरण करताना लाभार्थ्यांची बायोमेट्रिक पडताळणी न करता रास्तभाव दुकानदारांनी स्वत:चे आधार अधिप्रमाणित करुन धान्य वाटपाची विशेष सुविधा दिनांक १७/०३/२०२० ते दिनांक ३१/०७/२०२० पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली होती. तसेच कोरोना विषाणूची दुसरी लाट

विचारात घेता उपरोक्त विशेष सुविधा दिनांक ०१/०५/२०२१ ते ३१/०५/२०२१ या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आली होती. मागील वर्षभरात कोरोनामुळे संपूर्ण राज्यात एकूण ४९० रास्तभाव दुकानदार, त्यांचे सहायक यांचा मृत्यू झाला आहे.

(३) परवानाधारक रास्तभाव दुकानदार यांच्या मृत्यूनंतर त्यांचे रास्तभाव दुकान शासन निर्णय ११/०६/२०१५ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार त्यांच्या वारसाच्या नावे वर्ग करण्याची तरतूद आहे. त्यानुसार प्राप्त अर्जावर शासन नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.

तसेच राज्यात माहे मे, २०२१ पासून प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेतंर्गत मोफत ५ किलो धान्य वितरीत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील वरिष्ठ महाविद्‌यालये व विद्‌यापीठांमधील सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

(२६) ९०६० (१५-०६-२०२१) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेश कराड, श्री.सदाशिव खोत, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुण लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.किरण सरनाईक, डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध अनुदानित वरिष्ठ महाविद्‌यालये व विद्‌यापीठांमध्ये सुमारे १५ हजारांपेक्षा अधिक सहाय्यक प्राध्यापकांची पदे मागील सहा वर्षांपासून रिक्त असल्यामुळे विद्‌यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होत असून प्राध्यापकांच्या रिक्त पदांमुळे संस्थास्तरावर तात्पुरत्या स्वरुपात प्राध्यापकांच्या नेमणुका केल्या जातात, तसेच, ग्रामीण भागात पात्र उमेदवार

मिळत नसल्याने पदव्युत्तर पदवीमध्ये ५५ टक्के गुण असणाऱ्या उमेदवारांची नेमणूक करण्यात येते, परंतु त्यास विद्यापीठ मान्यता देत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात केंद्र व राज्य शासनाने आर्थिक कारण पुढे करून तासिका तत्वावर (सीएचबी) धोरण सुरू केले त्यातून उच्च शिक्षित मनुष्यबळ अतिशय कमी पैशात मिळत असल्याचे माहे मार्च, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, तसेच राज्यात कोरोनाच्या काळामध्ये शासनाने नियमित प्राध्यापकांचे वेतन दरमहा अदा केले, परंतु तासिका तत्वावरील प्राध्यापक मात्र मानधनापासून वंचित राहत असल्याचे माहे मे, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय आहे,

(३) असल्यास, दहा वर्षात नेट परीक्षा उत्तीर्ण लाखो विद्यार्थी व पीएचडीधारक हजारो असून विद्यार्थी संख्या कोटीच्या पुढे गेली असल्याने शिक्षणासारख्या सेवा क्षेत्रात कार्य करणाऱ्या तासिका तत्वावरील (सीएचबी) प्राध्यापकांना माहे मार्च, २०२० ते माहे फेब्रुवारी, २०२१ या ११ महिन्यांच्या कालावधीत शासनाने नियुक्त्या दिल्या नसल्याने त्यांना आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे, तसेच मागील १० वर्षे भरती प्रक्रिया थांबविली असल्याने राज्यात लाखो सहाय्यक सहयोगी प्राध्यापकांची पदे रिक्त असून सदरहू तासिका तत्वावरील (सीएचबी) प्राध्यापकांना कमी वेतन व मागील दोन वर्षापासून मानधन देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रत्येक वर्षी सेट-नेट उत्तीर्ण होणाऱ्यांची संख्या जास्त असल्यामुळे पीएचडी करूनही शिक्षण क्षेत्रात मनासारखी नोकरी न मिळाल्याने ३० ते ३५ वयातील अनेक उच्च विद्या विभूषितांना वेठबिगाराची (वेटर, मॅनेजर, तसेच रस्त्यावर पुस्तके, आंबे विकणे, फरशी फिटींग, गॅस वितरण करणे) अशी कामे करावी लागत असल्याने महाविद्यालय व विद्यापीठात १०० टक्के प्राध्यापक भरती करावी, तासिका (सीएचबी) धोरण पूर्णत: बंद करावे, कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट झाल्यानंतर सीएचबी अनुभव ग्राह्य धरण्यात यावा, जादा कार्यभारासाठी अर्धवेळ कायमस्वरूपी प्राध्यापक पदाची निर्मिती करावी, विनाअनुदानित महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान द्यावे आदी प्रमुख मागण्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील महाविद्यालयीन प्राध्यापकांचा नेट-सेटचा प्रश्न, प्राध्यापक भरतीचा प्रश्न, तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या मानधनाबाबत यासारख्या इतर विविध प्रश्नासाठी मा.मंत्री महोदयांबरोबर औरंगाबाद विभागातील शिक्षक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान आयोजित केलेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार शासनाने केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे, तसेच, राज्यातील वरिष्ठ महाविद्यालये व विद्यापीठात दिनांक ३१ मार्च, २०२१ अखेर प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकांची एकूण किती पदे रिक्त आहेत,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरीता सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे तात्काळ भरुन तासिका प्राध्यापकांचे मागील दोन वर्षापासूनचे मानधन अदा करण्यासाठी व संस्थास्तरावर नेमणुक दिलेल्या प्राध्यापकांना मान्यता देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच भरती सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत (०१-११-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १/१०/२०१७ च्या विद्यार्थीसंख्येनुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या ११७१ अशासकीय अनुदानित महाविद्यालयांत सहाय्यक प्राध्यापकांच्या अनुज्ञेय ३११८५ पदांपैकी २२२३६ पदे भरलेली असून ८९४९ पदे रिक्त आहेत.

तसेच माहे मार्च २०२०-२१ अखेर १२ व ३ अभिमत विद्यापीठे अशा एकदरीत १५ विद्यापीठांमध्ये एकूण २६०० शिक्षकीय पदे मंजूर असून १३२९ पदे भरलेली आहेत व १२७१ पदे रिक्त आहेत

(२) व (३) हे खरे नाही.

राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या तात्पुरत्या नियुक्त्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात येत असून, याबाबत शासनाच्या दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ च्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येते. सदरची नियुक्ती ही प्रत्यक्ष उपलब्ध कार्यभार तपासून एका पूर्णवेळ रिक्त पदाकरीता

फक्त दोनच अध्यापकांना एका शैक्षणिक वर्षासाठी जास्तीत जास्त ०९ महिन्यांसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात केली जाते आणि तद्नंतर सदरची नियुक्ती आपोआप संपुष्टात येते.

तथापि, सद्य:स्थितीत कोविड-१९ च्या माहामारीच्या पार्श्वभुमीवर वित्त विभागाच्या दिनांक ०४/०५/२०२० च्या आदेशानुसार पदभरतीस घातलेले निर्बंध लक्षात घेता, शासनाच्या दिनांक २३/२/२०२१ च्या पत्रान्वये सन २०१९-२० मध्ये ज्या अध्यापकांच्या तासिका तत्वावरील नियुक्त्या शासनाच्या दिनांक १४/११/२०१८ च्या आदेशातील तरतूदीनुसार विहीत मार्गाने झालेल्या आहेत, त्या अध्यापकांना अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात केवळ सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापुरतेच मुदतवाढ देण्यासंदर्भात प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्याचे संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना कळविण्यात आलेले आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) व (६) राज्यातील अकृषी विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेल्या शिक्षक/शिक्षकेतर पदांपैकी सहाय्यक प्राध्यापकांची ४० टक्के म्हणजेच ३५८० पदे भरण्यास उच्च स्तरिय सचिव समितीने मान्यता दिलेली आहे. यानुसार दिनांक ०३/११/२०१८ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यानुसार पदभरतीची प्रक्रीया सुरू होती. परंतु कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत वित्त विभागाच्या दिनांक ०४/०५/२०२० च्या आदेशान्वये निर्बंध जारी करण्यात आल्याने सद्य:स्थितीत वरील पदभरतीची प्रक्रिया स्थगित करण्यात आलेली आहे.

तथापि, यासंदर्भात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित आणि सदर भरती प्रक्रियांतर्गत असणारी पदे न भरल्यास होणारा परिणाम लक्षात घेता, उक्त भरती प्रक्रिया सुरू करण्याकरीता आवश्यक त्या समर्थनासह प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये नियुक्त केलेल्या पात्रताधारक तासिका तत्वावरील अध्यापकांच्या प्रलंबित मानधनाच्या रुपये १३,६१,३४,०००/- इतक्या रकमेस संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी त्यांच्या दिनांक ०९/१०/२०२० च्या पत्रान्वये मान्यता दिली असून संबंधित विभागीय सहसंचालकांकडून तासिका तत्वावरील नियुक्त अध्यापकांचे मानधन अदा करण्यात आलेले आहे.

राज्यातील तीन हजाराहून अधिक प्राथमिक शाळा बंद करण्यात येणार असल्याबाबत

(२७) ९०८७ (१५-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तीन हजाराहून अधिक प्राथमिक शाळा बंद करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून त्याबाबतचा आदेश जारी करण्यात आल्याचे दिनांक २७ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या उक्त निर्णयामुळे प्राथमिक शाळेतील हजारो विद्यार्थी शाळाबाहय होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्राथमिक शाळा बंद न करता त्या एकशिक्षकी सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (०९-११-२०२१) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत असणाऱ्या योजनांच्या सुविधांचा लाभ कोळी समाजातील मागास वर्गाला मिळणेबाबत

(२८) ९०९९ (१३-०७-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ४२१२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील आर्थिक स्थिती नाजूक असलेल्या व स्वखर्चाने निवारा बांधण्यास सक्षम नसलेल्या दुर्गम भागातील अनुसूचित जमातीतील आदिवासी लोकांना घर कर्ज योजना, बीज भांडवल योजना, प्रशिक्षण योजना अशा प्रकारच्या अनेक सुविधांचा लाभ शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत दिला जातो परंतु अनुसूचित जमातीतील कोळी बांधवांचा या योजनेत समावेश असूनही अशा प्रकारचा कोणत्याही योजनेचा लाभ त्यांना मिळत नसल्याचे माहे मे, २०२१ च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जमातीतील मागास असलेला कोळी समाज शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या लाभापासून वंचित रहात असल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत सर्व दिल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ कोळी समाजास मिळवून देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (१०-११-२०२१) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) अनुसूचित जमाती मध्ये समाविष्ट असलेल्या सर्व पात्र कुटुंबांना शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळा अंतर्गत योजनांचा लाभ दिला जातो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

महादेव कोळी समाजातील बांधवाना जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत

(२९) ९१०० (२२-०६-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महादेव कोळी समाजाला आदिवासी म्हणून मान्यता असून त्या समाजातील बांधवांना जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यास मोठ्या प्रमाणात अडचणी येत असल्याने अनेक तरुणांना आपली नोकरी गमवावी लागत असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने महादेव कोळी समाजातील नागरिकांना तात्काळ जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र द्यावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा कोळी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने महादेव कोळी, टोकरी कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी इत्यादी कोळी बांधवाना नोकरी गमवावी लागू नये याकरीता जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र तात्काळ मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (१०-११-२०२१) : (१) व (२) अशा आशयाचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(३) राज्यात महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० व त्याअंतर्गत करण्यात आलेले महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे (प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २००३ मधील तरतूदीनुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याची व त्याच्या पडताळणीची कार्यवाही करण्यात येते. तसेच उक्त अधिनियम २००० मधील कलम ८ नुसार अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करण्याची जबाबदारी ही असा दावा करणाऱ्या व्यक्तीवर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायत मधील फ्रंटलाईन वर्कर यांना विम्याचे सुरक्षा कवच मिळण्याबाबत

(३०) ९२३० (११-०६-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया, श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.रामदास आंबटकर : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भात कोरोना साथीच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेत आतापर्यंत राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायती मधील कर्मचारी फ्रंटलाईन वर्कर म्हणून काम करीत असताना मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वित्त विभाग, शासन निर्णय, संकिर्ण/२०२०/प्र.क्र.४/व्यह.व-९, दिनांक २९ मे, २०२० नुसार कोरोनाबाधित झाल्यामुळे मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना ५० लक्ष विम्याचा लाभ अथवा इतर कोणतीही मदत अद्यापपर्यंत मिळाली नसल्याने महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी संघटनेनी काम बंद आंदोलनाचा इशारा दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायतीमधील फ्रंटलाईन वर्कर म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विम्याचे सुरक्षा कवच देण्यास दिरंगाई करणाऱ्या दोषींविरोधात कारवाई करुन उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने सदर कर्मचाऱ्यांना विम्याचे सुरक्षा कवच देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (१२-११-२०२१) : (१), (२) व (३) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कोवीड-१९ शी संबंधित कर्तव्य बजावतांना कोविडमुळे मृत्यू होणाऱ्या कर्मचारी वृंद यांना रुपये ५० लक्षचे सानुग्रह सहाय्याची योजना शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२०/प्र.क्र.९९/नवि-२०, दिनांक ०४/०८/२०२१ रोजी अन्वये लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांचे थकित अनुदान देण्याबाबत

(३१) ९२३८ (१५-०६-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासनमान्य ग्रंथालयाचे मागील आर्थिक वर्षातील माहे सप्टेंबर पूर्वी देय असलेले ५० टक्के अनुदान माहे डिसेंबर, फेब्रुवारी व मार्चमध्ये टप्प्या टप्प्याने देण्यात आले असून उर्वरित ५० टक्के अनुदान अद्‌याप प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रंथालय कर्मचारी शासकीय सेवेत नसल्याने व उर्वरीत ५० टक्के अनुदान प्रलंबित असल्याने ग्रंथालय कर्मचारी मागील ४ महिन्यांपासून वेतनाविना आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रंथालयांचे उर्वरीत ५० टक्के अनुदान मिळण्याबाबत तसेच ग्रंथालय कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत (२८-१०-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचारी हे संबंधित स्वायत्त संस्थेचे कर्मचारी असून त्यांच्या सेवाशर्ती व वेतन देणे या बाबी संबंधित संस्थेशी निगडीत आहेत.

(३) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांच्या अनुदानाचा काही भाग निधी उपलब्धतेनुसार अदा करण्यात आला आहे. तसेच राज्यातील शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांचे सन २०२०-२१ मध्ये देय थकीत परिरक्षण अनुदान अदा करण्यासाठी रुपये ५१,४२,५००/- इतका निधी वितरीत करण्यास शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दिनांक २१/०६/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे सन २०२०-२१ मध्ये देय थकीत परिरक्षण अनुदान अदा करण्यासाठी रुपये ३६,७५,३७,५००/- इतका निधी वितरीत करण्यास शासन निर्णय, दिनांक २२/०७/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय, दिनांक १३/०८/२०२१ अन्वये शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांचे अनुदान अदा करण्यासाठी रुपये ५१,४२,५००/- इतका निधी व

शासन निर्णय, दिनांक २०/०८/२०२१ अन्वये शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे थकीत अनुदान अदा करण्यासाठी रुपये ०९,५८,६२,५००/- इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचारी हे संबंधित स्वायत्त संस्थेचे कर्मचारी असल्यामूळे त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर महाविद्यालयात संशोधन केंद्र सुरु करण्याबाबत

(३२) ९३४६ (२०-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठामध्ये शासकीय न्यायसहाय्यक वैद्यक संस्थेचा (फोरेन्सिक सायन्स) समावेश करण्यात आलेला असून या महाविद्यालयास संशोधन केंद्र देण्याच्या प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेने मान्यता देवूनही महाविद्यालयात संशोधन केंद्र मिळाले नसल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाविद्यालयात संशोधन केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत (२७-१०-२०२१) : (१) हे खरे नाही. असा कोणताही प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेत आल्याचे आढळून येत नाही. तसेच उच्च संशोधन केंद्र म्हणून मान्यता मिळण्याकरीता संबंधित महाविद्यालयाकडून रितसर प्रस्ताव

विद्यापीठाला देखील प्राप्त झालेला नाही. परंतु, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२० रोजी संपन्न झालेल्या अधिसभेत बाब क्र.१९(२) अंतर्गत सदर महाविद्यालयास संशोधन केंद्र म्हणून मान्यता देण्याबाबतचा ठराव अधिसभा सदस्य श्री.दिनेश शेराम यांनी सादर केला होता. सदर ठरावावर विद्यापीठाच्या अधिसभेने कोणताही निर्णय न घेता फक्त नोंद घेतली आहे.

(२) महाविद्यालयाकडून रीतसर प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील बुटीबोरी औद्योगिक वसाहतीत उद्योगांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

(३३) ९३५४ (२२-०६-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील बुटीबोरी औद्योगिक वसाहत टप्पा दोन येथे पायाभूत सुविधांच्या अभावामुळे व जमिनीचे प्रचंड दर यामुळे १४०० हेक्टर औद्योगिक जमिनीचा वापर उद्योगांसाठी न होता ती तशीच पडून असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नागपूर येथील बुटीबोरी औद्योगिक वसाहत टप्पा दोन येथे जमिनीचे दर कमी करुन उद्योग निर्मितीसाठी उद्योजकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई (११-१०-२०२१) : (१) व (२) हे खरे नाही.

नागपूर येथील बुटीबोरी औद्योगिक वसाहत टप्पा दोन करीता १८५.० हे.आर जागेचे भूसंपादन केले असून या औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधा, जसे डांबरी रस्ते, जलवाहीनी व पथदिवे, पुरविण्यात आल्या आहेत. या

औद्योगिक क्षेत्रात १५३ भूखंडाचे आरेखन करण्यात आले. माहे मे, २०२१ पर्यंत ३६ भूखंडाचे वाटप करण्यात आले असून त्यापैकी २ भूखंडावर उत्पादन सुरू आहे व ४ भूखंडांवर बांधकाम सुरू आहे.

अतिरीक्त बुटीबोरी औद्योगिक क्षेत्राकरीता १३१४.०७ हे.आर जागेचे संपादन करण्यात आले असून पायाभूत सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. या क्षेत्रामध्ये १६ द.ल.ली. प्रती दिन पाणीपुरवठा वरून प्रती दिन ७० द.ल.ली. प्रती दिन पाणीपुरवठा कार्यान्वित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. प्रती दिन ५.०० द.ल.ली. क्षमतेचे सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणीचे काम सुरू आहे तसेच सबस्टेशनसह विद्युत वाहिनीचे जाळे टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या क्षेत्रात २७५ भूखंडाचे आरेखन करण्यात आलेले आहे. आरेखित भूखंडापैकी एकूण ११६.७८ हे.आर भूखंडाचे क्षेत्र वाटप करण्यात आले असून ६४.०० हे.आर क्षेत्राच्या भूखंड वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

बुटीबोरी औद्योगिक क्षेत्राचा परिसर लक्षात घेता सदर ओद्योगिक क्षेत्रातील दर वाजवी आहेत. सद्य:स्थितीत सदर औद्योगिक क्षेत्रात रिक्त भूखंड ऑनलाईन पध्दतीने वाटप करण्याचे महामंडळाचे धोरण असून गुंतवणूकदारांना सदर औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी नेहमीच प्रोत्साहित केले जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासी क्षेत्रातील आदिवासी आश्रमशाळांतील कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत

(३४) ९३६९ (१३-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी क्षेत्रातील आदिवासी आश्रमशाळांतील वर्ग तीन व चार पदावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासनसेवेत कायम करण्याबाबत सातत्याने मागणी करण्यात येत असून यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयानेही आपला निर्णय दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर कर्मचाऱ्यांना शासनसेवेत कायम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (०९-११-२०२१) : (१) दहापेक्षा अधिक वर्षापासून शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये तासिका तत्वावर व मानधन तत्वावर कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाच्या सेवेत नियमित करण्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई व खंडपीठ, औरंगाबाद व नागपूर येथे दाखल केलेल्या रिट याचिकांपैकी रिट याचिका क्र.७३५१/२०१२, रिट याचिका क्र.२१९४/२०१३ (२९ कर्मचारी) रिट याचिका क्र.२१९६/२०१३ (२९ कर्मचारी) व रिट याचिका क्र.५८६७/२०१५ (२९ कर्मचारी) प्रकरणी एकूण ८७ कर्मचाऱ्यांपैकी ज्या ५० कर्मचाऱ्यांची सेवा १० वर्षापेक्षा जास्त झालेली आहे व ज्यांनी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली आहे अशा ५० कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी दिनांक ३१/१०/२०१८ रोजी दिलेला न्यायनिर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी रिट याचिका क्र.७३५१/२०१२, रिट याचिका क्र.२१९४/२०१३ (२९ कर्मचारी) रिट याचिका क्र.२१९६/२०१३ (२९ कर्मचारी) व रिट याचिका क्र.५८६७/२०१५ (२९ कर्मचारी) मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेला न्यायनिर्णय तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, असे एकूण ८७ कर्मचाऱ्यांपैकी १० वर्षापेक्षा जास्त सेवा झालेल्या व आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या ५० कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करण्यासाठीच्या प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय आश्रमशाळामध्ये आवश्यक सोयी सुविधा नसल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याबाबत

(३५) ९३८६ (१३-०७-२०२१) डॉ.रणजित पाटील, श्री.जयंत आसगावकर : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय आश्रमशाळांमध्ये आवश्यक सोयी सुविधा नसल्याने आदिवासी विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिणामी गत वर्षात आठ आदिवासी विद्यार्थ्यांचे मृत्यू झाल्याची तसेच, आश्रमशाळातील विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारलेले मुख्याध्यापक, अधीक्षक आश्रमशाळेत राहत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे मृत्यूचे प्रकार रोखण्यासाठी व या आश्रमशाळांमध्ये अद्यावत सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (०२-११-२०२१) : (१) हे खरे नाही.

(२) सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचे विविध कारणांनी १४६ विद्यार्थ्यांचे मृत्यू झालेले आहेत. सदर मृत्यू पालकांच्या ताब्यात असताना झालेले आहे. शासकीय आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आश्रमशाळेत निवासी राहतात. जेथे शासकीय निवासस्थान उपलब्ध नाही, अशा ठिकाणी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी संबंधित गावामध्ये राहणे बंधनकारक आहे. याबाबत दिनांक २४ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये परिपूर्ण सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(३) व (४) शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून व विद्यार्थ्यांचे मृत्यू टाळण्याच्या अनुषंगाने राज्यस्तरावरील गाभा समितीच्या धर्तीवर आदिवासी विकास प्रकल्प गाभा समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये बालविकास प्रकल्प अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक इत्यादी इतर विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. समितीच्या प्रकल्प स्तरावर बैठका होऊन विविध विभागांमध्ये समन्वय साधला जातो. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सर्पदंश किंवा सरपटणाऱ्या अन्य प्राण्यांचा प्रादुर्भाव होऊ नये याकरीता इमारतीला असणारे बिळ बुजविणे, दरवाजा, खिडक्या यातील फटी बुजविणे, दरवाजाचा उंबरठा तयार करणे इत्यादी दुरूस्तीचे कामे विशेष मोहिमेद्वारे करण्यात आली.

तसेच किरकोळ दुरूस्ती करणे, जलनिसारण, स्वच्छता ठेवणे, विद्यार्थ्यांच्या तातडीच्या उपचारसाठी वाहतूक व उपचार करणे, खाजगी वैद्यकीय उपचार घेणे इत्यादीसाठी शाळा व्यस्थापन समितीमार्फत निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

भारत विकास ग्रुप (BVG) च्या माध्यमातून अपर आयुक्त, नाशिक, अमरावती व नागपूर विभागातील ३०१ शासकीय आश्रमशाळा व ८ एकलव्य निवासी आश्रमशाळांमधील सुमारे १ लाख पेक्षा जास्त विद्यार्थ्यांसाठी २४x७ तास आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच राज्यातील आदिवासी विकास विभागातंर्गत अतिदुर्गम ठिकाणी असलेल्या २०१ शासकीय आश्रमशाळा व ६ एकलव्य निवासी आश्रमशाळा मधील सर्व गरजू व आजारी विद्यार्थ्यांना तज्ञ डॉक्टरांचे २४x७ तास मार्गदर्शन मिळावे याकरीता कमांड सेंटर स्थापन करणे, शाळा स्तरावर आरोग्य सुविधा अधिक बळकट करणे या सारख्या सेवा मे, अमेया लाईफ या संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

मुंबई विद्यापीठातील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

(३६) ९४१८ (१५-०६-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबई विद्यापीठातील भाषा शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असताना चौदा भाषा विभागामध्ये पुरेशा प्रमाणात प्राध्यापक नसल्याने ६० टक्के पदे रिक्त असल्याचे माहे मार्च, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले असून पाली, सिंधी आणि रशियन विभागामध्ये एकही कायमस्वरूपी प्राध्यापक नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेगळे काही शिकत असताना भाषा शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असल्याने चौदा भाषा विभागामध्ये पुरेशे प्राध्यापक न नेमण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ६० टक्के प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत (२९-१०-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई विद्यापीठातील पाली विभाग विद्यापीठ निधीतून सुरू आहे. तसेच सिंधी व रशियन भाषा विभागातील शिक्षकीय पदे रिक्त आहे. सदर विभागात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन विद्यापीठाने शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती केली आहे.

(२) व (३) मुंबई विद्यापीठातील अनुदानित विभागामध्ये शासनमान्य मंजूर आढाव्यानुसार एकूण ३६५ शिक्षकीय पदांपैकी २१९ पदे रिक्त आहेत. वित्त विभागाच्या दिनांक २५/०५/२०१७ च्या शासन निर्णयान्वये नविन पद भरतीवर निर्बंध घालण्यात आले होते. त्यामुळे सदर पदभरती करण्यात आली नाही. तद्नंतर शासन निर्णय दिनांक ०७/०८/२०१९ अन्वये सर्व अकृषी विद्यापीठातील मंजूरी पदांच्या ८० टक्के इतक्या मर्यादेत शिक्षकीय पदे भरण्याची मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार मुंबई विद्यापीठातील एकूण १३६ पदे भरण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे तथापि, दरम्यानच्या काळात वित्त विभागाने त्यांच्या दिनांक ०४/०५/२०२० च्या शासन निर्णयान्वये कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील वित्तीय

स्थितीसंदर्भात उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२० अन्वये पदभरतीवर निर्बंध आणले आहेत. तथापि, दिनांक ०७/०८/२०१९ अन्वये मंजूरी दिलेल्या पदांची भरतीप्रक्रिया राबवण्यास मंजूरी देण्याबाबत वित्त विभागास विनंती केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

रत्नागिरी जिल्ह्यातील खाजगी माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पूर्ण वेतन अदा करण्याबाबत

(३७) ९४२९ (२०-०७-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील असंख्य खाजगी माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कोरोना महामारीच्या काळात मागील वर्षापासून पूर्ण वेतन दिले नसून अनेक शैक्षणिक संस्थांनी निम्मे वेतन देऊन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा बंद असणे हा शिक्षकांचा दोष नाही तेव्हा अशा शिक्षकांना प्रलंबित वेतनासह पूर्ण वेतन तात्काळ देण्यात यावे अशी मागणी समविचारी मंचाने माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत जिल्हा शिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग, रत्नागिरी आणि उपसंचालक, कोल्हापूर यांना सविस्तर पत्रे देण्यात आली असून त्यावर काही कारवाई न झाल्यास संबंधित शिक्षकांसह आंदोलन करण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र समविचारी मंचाने दिला असून जिल्ह्यातील अनेक माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वेतनाअभावी आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त खाजगी माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२८-१०-२०२१) : (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात कोरोना काळात शिक्षकसेवकांना आरोग्य सुविधा देण्याबाबत

(३८) ९४७० (१५-०६-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना काळात अनेक शिक्षकांचा व शिक्षकसेवकांचा कोरोनामुळे दुर्दैवी मृत्यू झाल्याचे दिनांक २० एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून सदरहू शिक्षक सेवकांना राज्य शासनाची कोणतीही पेन्शन योजना लागू नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोरोनामुळे मृत्यूमुखी पडलेल्या शिक्षकसवेकांना आर्थिक मदत व तातडीने आरोग्य सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२९-१०-२०२१) : (१) व (२) हे खरे नाही. कोवीड-१९ संबंधित कर्तव्य बजावताना कोवीड-१९ विषाणुचा संसर्ग होऊन दुर्दैवी मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांना विमा कवच/ सानुग्रह अनुदान लागू करण्याबाबत शासन निर्णय दिनांक २९ मे, २०२० रोजी वित्त विभागाद्‌वारे निर्गमित करण्यात आला आहे. या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कोवीड-१९ विषाणुच्या संसर्गामुळे मृत्यू झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विमा कवच/ सानुग्रह अनुदान लागू करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

शासकीय सेवेतील गट ब (अराजपत्रित) व गट क संवर्गातील पद भरती खाजगी कंपन्यांमार्फत राबविण्यात येणार असल्याबाबत

(३९) ९४७१ (१७-०६-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेतील गट ब (अराजपत्रित) व गट क संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी खाजगी कंपन्यांमार्फत भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय शासनामार्फत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यासाठी शासनाने ५ खाजगी कंपन्यांची नियुक्ती केली असल्यामुळे शासनाच्या उक्त निर्णयाला लोकप्रतिनिधींनी व उमेदवारांनी विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर निर्णय मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे (०८-११-२०२१) : (१) होय, हे खरे आहे. याबाबत शासन निर्णय क्र.मातंस-२०२०/प्र.क्र.११/से-२/३९, दिनांक २० फेब्रुवारी, २०२० प्रसिध्द करण्यात आला आहे.

(२) सामान्य प्रशासन विभाग यांच्या शासन निर्णय क्र.प्रानिम-१२२१/प्र.क्र.५/का-१३ अ, दिनांक २२/०४/२०२१ नुसार ५ खाजगी कंपन्यांची नियुक्ती करण्यात आली. सदर निर्णयाला अनुसरून काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(३) महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून दिनांक २८/०९/२०२१ चे पत्रान्वये प्राप्त झालेल्या माहितीनुसार निविदा प्रक्रिये, निविदादाराकडून ब्लॅक लिस्टिंग संदर्भात, प्रतिज्ञापत्र घेतले आहे की तो केंद्र शासन अथवा इतर कोणत्याही राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाकडून, निविदा दाखल करताना ब्लॅक लिस्ट किंवा बहिष्कृत झालेला नाही. निविदा प्रक्रिये दरम्यान प्राप्त झालेल्या निविदांची ब्लॅक लिस्टिंग संदर्भात पडताळणी, इंटरनेटवर

उपलब्ध असलेली माहिती अथवा कोणी प्रत्यक्ष उपलब्ध करून दिलेली माहिती, यावर अवलंबून असते. या इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे ५ कंपन्यांकडून अतिरिक्त माहिती मागवण्यात आली. ज्या शासकीय/निमशासकीय विभागांनी बिडर्स Black list केले त्यांच्याकडे त्याचा खुलासा मागण्यात आला व त्यानुसार काही बिडर्स अपात्र ठरले, तसेच काही बिडर्स संदर्भात आलेल्या तक्रारी या चुकीच्या ठरल्या. ते बिडर्स पात्र ठरविण्यात आले. त्याची पडताळणी करून त्यातील २ कंपन्यांना या निविदा प्रक्रियेतून अपात्र करण्यात आले.

सामान्य प्रशासन विभाग यांच्या शासन निर्णय क्र.प्रानिम-१२२१/प्र.क्र.५/का-१३ अ, दिनांक २२/०४/२०२१ नुसार, भरती प्रक्रिया राबविणाऱ्या कंपन्यांबाबत काही आक्षेप, वाद अथवा अडचणी उद्भवल्यास त्यांचे निराकरण करण्याची संपूर्ण जबाबदारी ही संबंधित मंत्रालयीन विभाग अथवा निवड समितीची राहील. माहिती व जनसंपर्क कार्यालयाने निदर्शनास आणलेल्या दै.लोकसत्ता मधील दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ च्या बातमी नुसार महाआयटी ने दिल्ली उच्च न्यायालयाच्या व अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या आदेशांचे अवलोकन केले असता M/S Aptech Limited या कंपनीला UP Power कॉर्पोरेशन च्या भरती प्रक्रियेदरम्यान अलाहाबाद उच्च न्यायालयाने काळया यादीत टाकले व दिल्ली उच्च न्यायालयाने रूपये.१०,००,०००/- इतका दंड चुकीची माहिती कळविल्याबद्दल आकारल्याचे सकृतदर्शनी दिसत आहे. याबाबत महाआयटी यांचे पत्र क.MH-IT/OW/०९२१/०२११४, दिनांक २१/०९/२०२१ रोजी सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन-१३अ यांना कळविले आहे.

(४) निरंक.

राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळेतील कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता मिळत नसल्याबाबत

(४०) ९४७८ (२०-०७-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळांव्यतिरिक्त इतर विभागातील कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता मिळत असून संस्थांतर्गत असणारे कर्मचारी सदरहू प्रोत्साहन भत्त्यापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू क्षेत्रातील शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२८-१०-२०२१) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

पैठण (जि.औरंगाबाद) येथे संतपीठ उभारण्याच्या निर्णयाबाबत

(४१) ९५१४ (१५-०६-२०२१) श्री.विक्रम काळे : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैठण (जि.औरंगाबाद) येथे संतपीठ उभारण्याचा निर्णय शासनाने दिनांक १९ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास घेतला असून सदरहू संतपीठास जगदगुरु संत एकनाथ महाराज यांचे नाव देण्यात येणार असून प्रत्यक्ष अभ्यासक्रमाला दिनांक १ जानेवारी, २०२१ पासून सुरुवात होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संतपीठासाठी सुरु करावयाच्या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत (२४-०९-२०२१) : (१) व (२) पैठण जि.औरंगाबाद येथे संतपीठ कार्यान्वित करण्यासाठी संतपीठाशी संबंधित तज्ञ व्यक्तींची समिती गठित करण्याचे प्रस्तावित आहे. सदर समितीने या संदर्भातील शिफारशी शासनास सादर केल्यावर पैठण येथील संतपीठ कार्यान्वित करण्यासंदर्भात पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

आदिवासी विकास महामंडळाचे धान्य खरेदीसंदर्भातील बंद पडलेले ऑनलाईन प्रक्रियेचे पोर्टल सुरु करण्याबाबत

(४२) ९५६३ (०९-०६-२०२१) श्री.अमोल मिटकरी : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विविध कार्यकारी सोसायटी अंतर्गत येणाऱ्या गावांचा शेतमाल आदिवासी विकास महामंडळाकडून खरेदी केला जात असून त्याची ऑनलाईन नोंदणी केली जाते, परंतु दिनांक ३० एप्रिल, २०२१ पर्यंत ऑनलाईन नोंदणीची मुदत होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन प्रक्रियेचे पोर्टल सुरु नसल्याने आदिवासी विकास महामंडळामार्फत धान्य खरेदी थांबली असून यवतमाळ जिल्ह्यातील तसेच अन्य जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी राखुन ठेवलेला शेतीमाल अद्याप शेतकऱ्यांच्या घरीच पडून असल्याचे दिनांक १७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने बंद पडलेले पोर्टल त्वरीत सुरु करून शेतकऱ्यांकडे पडून असलेला शेतीमाल आदिवासी विकास महामंडळाकडून खरेदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (१०-११-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शासनाच्या दिनांक १९ मे, २०२१ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ३१/०५/२०२१ रोजी पर्यंत शेतकऱ्यांच्या नोंदी Ne,ML पोर्टलवर घेणे करीता मुदतवाढ देण्यात आली होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात सर्वच क्षेत्रात कौशल्यपूर्ण मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी एच.एस.सी. व्होकेशनल अभ्यासक्रम अदयावत करणेबाबत

(४३) ९६६७ (२०-०७-२०२१) श्री.अरुण लाड : सन्माननीय **कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वच क्षेत्रातील नोकऱ्यांचे प्रमाण घटल्याने बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून कौशल्यपूर्ण मनुष्यबळाची कमतरता जाणवत असल्याने सध्या सुरु असलेले एच.एस.सी. व्होकेशनल कोर्सेस जुना अभ्यासक्रम, प्रॅक्टीकलच्या अपुऱ्या सोयीसुविधा व साधनसामुग्री, पर्यवेक्षणाचा अभाव यामुळे निरुपयोगी ठरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने करुन एच.एस.सी. व्होकेशनल अभ्यासक्रम अदयावत करुन विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.नवाब मलिक (०१-११-२०२१) : (१) व (२) जागतिकीकरणाच्या काळात आवश्यक कौशल्ये विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावेत या हेतूने +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांचे रुपांतर करण्याच्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने शासनास शिफारस करण्यासाठी दिनांक १६ मार्च, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीस अहवाल सादर करण्यास दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागांतर्गत नियोजित कामे काही ठराविक कंपनींना देऊन गैरव्यवहार केल्याबाबत

(४४) ९७४५ (१५-०७-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ (जि.यवतमाळ) जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता विभागांतर्गत असलेल्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शासनाच्या विविध निधीतून कोट्यवधी रुपयांची कामे काही ठराविक कंपन्यांना देऊन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात येत असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यवतमाळ जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागांतर्गत नियोजित कामे काही ठराविक कंपनींना देऊन गैरव्यवहार करणाऱ्या जिल्हा परिषदेतील दोषी अधिकाऱ्यांवर व सदर कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गुलाबराव पाटील (१०-११-२०२१) : (१) याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना एप्रिल, २०२१ मध्ये तक्रार प्राप्त झाली होती. तसेच वर्तमानपत्रामध्ये दिनांक २१/०५/२०२१, ०१/०६/२०२१ व दिनांक ०२/०६/२०२१ रोजी बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या.
(२) सदर तक्रारी व बातम्यांच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्या दिनांक ३०/०६/२०२१ च्या आदेशान्वये चार सदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली आहे. सदर चौकशी समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले असतानाही दोषी अधिकाऱ्यांची सेवानिवृत्तीनंतरही TRTI येथे नियुक्ती केल्याबाबत

(४५) ९८३१ (१२-०७-२०२१) श्री.सुरेश धस : तारांकित प्रश्न क्रमांक ६९०० ला दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात आदिवासी विकास विभागातील कथीत १०,५०० पेक्षाही अधिक कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराबाबत शासनस्तरावरुन नेमलेल्या निवृत्त न्यायमूर्ती श्री.गायकवाड समितीने दोषी ठरविलेल्या व दोन वेळा F.I.R. झालेल्या अधिकाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर सहआयुक्त या पदावर तीन वर्षे मानधनावर सेवेत कार्यरत ठेवल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक गैरव्यवहारात दोषी असताना तसेच सेवानिवृत्त होऊनही तीन वर्षानंतर शासनाच्या परवानगीशिवाय मानधनावर ठेवता येत नाही असे असतानाही निवृत्त दोषी अधिकाऱ्यांची शासनाची कोणतीही परवानगी न घेताही परत मानधनावर नियुक्ती करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्या पुर्वग्रहदूषित कामकाजातील हस्तक्षेपाने त्यांना तेथुन हटवण्यासाठी आदिवासी विभागाच्या कर्मचाऱ्यांमध्ये व संपूर्ण आदिवासी समाजामध्ये तीव्र असंतोष निर्माण होवुन संतापाची भावना निर्माण झालेली असतानाही जाणीवपुर्वक, हेतुपुरस्सर, पुर्वग्रहदूषितपणे त्यांना शासनाकडुन पाठीसी घातले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गौरव बंशीलाल पवार व महाराष्ट्र शासन या प्रकरणामध्ये ठराविक अधिकाऱ्यांचा नामोल्लेख करून अशा अधिकाऱ्यांना जात पडताळणी समितीशी निगडित कुठल्याही पदावर नियुक्ती न देण्याबाबत स्पष्टपणे निर्देशित केलेले असतानासुध्दा TRTI येथे नियुक्त्या देण्यात आलेल्या असून त्यांना तात्काळ तेथुन हटवुन पाठीशी घालणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (०९-११-२०२१) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) अशी नियुक्ती करण्यात आलेली नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

नव्या शिक्षण वर्षाची सुरुवात सर्वच इयत्तासाठी दुरदर्शनच्या ऑनलाईन माध्यमातून करण्याबाबत

(४६) ९८८९ (१५-०६-२०२१) श्री.नरेंद्र दराडे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या शिक्षण विभागाने मागील वर्षी केंद्राच्या ''दिक्षा'' या उपयोजनेच्या आणि "व्हॉट्सॲप" व्दारे विद्‌यार्थ्यांपर्यंत ऑनलाईन शिक्षण पोहचण्याचे प्रयोग करुन "शाळा बंद, अभ्यास सुरु" या उपक्रमाव्दारे व्हॉट्सॲपवर स्वाध्याय पाठविले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानंतर विविध सर्वेक्षणामधून दुरदर्शन उपलब्ध असणाऱ्या विद्‌यार्थ्यांची संख्या सर्वाधिक असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे व कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे नव्या शिक्षण वर्षाची सुरुवातही सर्वच इयत्तासाठी दुरदर्शनच्या ऑनलाईन माध्यमातून होणार असल्याने विद्‌यार्थ्यांना शिक्षणाचे धडे देण्याचा प्रस्ताव शिक्षण विभागाने दुरदर्शनकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावानुसार यंदा दिनांक १५ जूनपासून सुरु होणारे नवे शैक्षणिक वर्षही ऑनलाईन वर्गातच सुरु राहणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिक्षण विभागाने दुरदर्शनच्या माध्यमातून यासाठी काय व्यवस्था व उपाययोजना उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने निर्णयात्मक कार्यवाहीची सद्‌यःस्थिती काय आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड (०७-१०-२०२१) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) दिनांक १४/०६/२०२१ पासून डी.डी. सह्याद्री वाहिनीवरून सोमवार ते शुक्रवार दैनिक ५ तास (३००मिनिटे) एवढ्या कालावधीसाठी शैक्षणिक तासिकांचे प्रक्षेपण सूरू करण्यात आलेले आहे. या शैक्षणिक तासिकांचे विस्तारीत दैनिक वेळापत्रक देखील विद्यार्थ्यांना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व सुट्ट्या नियमित करण्याबाबत

(४७) ९९९६ (१६-०६-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.रमेश कराड : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व सुट्ट्या नियमित करण्यात याव्यात अशी मागणी शिक्षक संघाद्वारे करण्यात आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांवरील विशेषत: धुळे व नंदुरबार आणि इतर जिल्ह्यांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन प्रत्येक वेळी विलंबाने होत असल्यामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक विवंचनेला सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आश्रमशाळांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शिक्षक संघाद्वारे केलेल्या अन्य मागण्याही तात्काळ सोडविण्यात येणार काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व सुट्ट्या नियमित करण्याची मागणीसह इतर अनेक मागण्या पूर्ण होण्याच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (०२-११-२०२१) : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या अंतर्गत २१३ शासकीय आश्रमशाळा व २११ अनुदानित आश्रमशाळा आहेत. माहे सप्टेंबर, २०२१ पर्यंत अपर आयुक्त, नाशिक व त्यांच्या अंतर्गत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना वेतनासाठी निधी वितरीत करण्यात आला आहे.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना नियमानुसार सुट्या देय आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासी परिक्षेत्रातील शाळांना बिगर आदिवासी क्षेत्रातील शाळेच्या हेडखाली समाविष्ट करण्याबाबत

(४८) १००१९ (२०-०७-२०२१) श्री.किरण सरनाईक : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १९०१ हेड खालील आदिवासी परिक्षेत्रातील शाळांना बिगर आदिवासी क्षेत्रातील शाळेच्या हेड खाली समाविष्ट करण्यात न आल्याचे माहे मे, २०२१ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राज्यातील १९०१ हेड खालील आदिवासी परिक्षेत्रातील शाळांना बिगर आदिवासी क्षेत्रातील शाळेच्या हेड खाली समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२५-१०-२०२१) : (१) होय. हे खरे आहे.
(२) वित्त विभागाच्या दिनांक २७ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ६ नूसार आदिवासी उप योजना राबविणाऱ्या ज्या आस्थापना आहेत, त्याचेसाठी उपलब्ध होणारा निधी हा कार्यक्रमांवरील खर्चाकडे वर्ग करण्यात येईल असे निदेश देण्यात आले असल्यामुळे सदर लेखाशीर्ष अनिवार्य खर्चात समाविष्ट करता येत नाही. तथापि, विभागाकडून सदरचा प्रस्ताव आदिवासी विकास विभाग, नियोजन विभाग यांचेमार्फत वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्याबाबत

(४९) १००२४ (०९-०६-२०२१) श्री.रमेश कराड : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रमगड (ता.विक्रमगड, जि.पालघर) स्वतंत्र तालुका करण्यात आल्यापासून तालुक्यातील नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे अनेक पक्ष संघटनांनी समस्यांसाठी आंदोलने/मोर्चे केले असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विक्रमगड तालुक्यातील खावटी योजनेचा लाभ, आरोग्य उपकेंद्राच्या सुविधेत सुधारणा, रेशनिंग समस्या व विभक्त रेशन कार्डधारकांना धान्य, संजय गांधी निराधार योजनेची अंमलबजावणी, रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायतींमध्ये कामे तसेच तालुक्यातील पाणी टंचाई दूर करावी इत्यादी मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विक्रमगड तालुक्यातील नागरिकांनी मागण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (१०-११-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

विक्रमगड तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या पात्र १४२२२ कुटुंबींयांना खावटी योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात इयत्ता दहावीसाठी अंतर्गत गुण सुरू करण्याबाबत

(५०) ४९३३१ (२९-०८-२०१९) श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात इयत्ता दहावीसाठी अंतर्गत गुण सुरू करण्याबाबत शासनाने समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, याबाबत समितीने केलेल्या शिफारसींचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन समितीने अहवालात केलेल्या शिफारसींच्या अनुषंगाने सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात इयत्ता दहावीसाठी अंतर्गत गुण सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२२-११-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) होय, याबाबत समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशी खालीलप्रमाणे आहेत.

१. लेखी मूल्यमापनासोबत विद्‌यार्थ्यांच्या वेगवेगळया क्षमतांचे मापन करण्यासाठी तसेच विद्‌यार्थ्यांच्या प्रगतीचे सातत्यपूर्ण मूल्यमापन होण्यासाठी अंतर्गत मूल्यमापन समाविष्ट करणे.

२. इयत्ता ९ वी १० वी करीता भाषा व समाजशास्त्र या विषयाकरीता लेखी परीक्षेद्‌वारे मूल्यमापन ८० गुणांचे व अंतर्गत मूल्यमापन २० गुणांचे करणे.

३. इयत्ता ९ वी १० वीच्या अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व घटकनिहाय गुणभार राज्य मंडळ स्तरावर संबंधित विषयाच्या अभ्यास समितीच्या/अभ्यास गटाच्या सहाय्याने निश्चित करण्यात यावे.

४. इयत्ता ९ वी १० वी मध्ये विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्याकरीता विद्यार्थ्यास प्रत्येक विषयात लेखी व अंतर्गत मूल्यमापन मिळून किमान ३५% गुण प्राप्त करणे अनिवार्य करावे.

५. राज्य मंडळाच्या प्रचलित निकषाप्रमाणे सवलतींच्या गुणांची तरतूद (Gace Mark System) सुरु करणे तसेच शास्त्रीय कला, चित्रकला, लोककला व क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या/सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारे सवलती अतिरिक्त गुण प्रचलित निकषांप्रमाणे सुरु ठेवणे.

(३) इयत्ता दहावीसाठी अंतर्गत गुण सुरु करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२४३/एसडी-४, दिनांक ०८ ऑगस्ट, २०१९ नुसार सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजना लागू करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

श्री.राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.